कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई व त्यांचे अधिनस्त असलेल्या विभागीय कार्यालयातील शिपाई संवर्गातील पदे अनुकंपा नियुक्तीसाठी पुनर्जीवित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन आदेश क्रमांकः अकंपा- ०९२५/प्र.क्र. २१७/कामगार-८
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: १५ सप्टेंबर, २०२५

संदर्भ :-

१) उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, शासन निर्णय क्रमांक: काआआ- २०१३/प्र.क. १४७/कामगार-८, दि. ०६.१२.२०२१.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि- २०२२/प्र.क्र. १५/आ.पु.क., दि. ०८.०८.२०२४.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. अकंपा-१२२५/प्र.क्र. १२१/म.लो.आ., दि.१७.०७.२०२५.
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. अकंपा-१२२५/प्र.क्र. १९४/म.लो.आ., दि.२२.०८.२०२५.
५) कामगार आयुक्त यांचे पत्र क्र. काआ/आस्था/शिपाई पदे पुर्न/२०२५/कार्या-२/ ११२४/११२५, दि.१०.०९.२०२५.
६) कामगार आयुक्त यांचे पत्र क्र. काआ/आस्था/शिपाई पदे पुर्न/२०२५/कार्या-२/ ११२६/११२८, दि.११.०९.२०२५.

प्रस्तावना :-

उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या अधिपत्याखालील कामगार आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारीत आकृतीबंध दि. ०६ डिसेंबर, २०२१ रोजी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर आकृतीबंधात गट- ड संवर्ग "मृत संवर्ग" घोषित करण्यात आला आहे.

तथापि, वित्त विभागाने संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय दि. ०८ ऑगस्ट, २०२४ अन्वये, दि.१३.०७.२०२१ नंतर मान्यता देण्यात आलेल्या आकृतीबंधात मृत ठरविलेल्या गट-ड संवर्गातील अनुकंपा नियुक्त्यांसंदर्भात आवश्यक तितकी नियमित पदे राखीव ठेवण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना दिलेले आहेत.

तसेच, सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णय दि. १७.०७.२०२५ अन्वये, अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक धोरण निश्चित केले आहे. त्याचप्रमाणे, सामान्य प्रशासन विभागाने अनुकंपा नियुक्तीचे सर्वसमावेशक सुधारित धोरणाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींबाबत संदर्भ क्र. ४ येथील दि. २२.०८.२०२५ च्या शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शन केले आहे.

त्यानुषंगाने, कामगार आयुक्त यांनी मुंबई, नाशिक, अमरावती, नागपूर व पुणे विभागातील मृत ठरविलेल्या गट-ड संवर्गातील शिपाई पदे पुनर्जीवित करण्याची विनंती केली आहे. सदर विनंतीनुसार संदर्भीय क्र. १ अन्वये मुंबई, नाशिक, अमरावती, नागपूर व पुणे विभागातील मृत ठरविलेल्या गट-ड संवर्गातील शिपाई पदे पदसंख्येच्या मर्यादेत प्रतिक्षासूचीतील उमेदवारांची संख्या विचारात घेवून अनुकंपा नियुक्तीसाठी पुनर्जीवित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश :-**

कामगार आयुक्त कार्यालय मुंबई व त्यांचे अधिनस्त नाशिक, अमरावती, नागपूर व पुणे विभागात शिपाई संवर्गातील मंजूर पदांपैकी गट-ड संवर्गातील प्रतिक्षासूचीतील उमेदवारांची संख्या विचारात घेता यासोबत जोडण्यात आलेल्या **विवरणपत्र- अ** नुसार अनुकंपा नियुक्तीसाठी १२ पदे पुनर्जीवित करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून या शासन आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

१) गट-ड च्या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती केलेला कर्मचारी हा पदोन्नत झाल्यामुळे अथवा सेवानिवृत्त झाल्यामुळे अथवा इतर कारणामुळे हे पद रिक्त झाल्यास ते नियमित पद व्यपगत होईल.

२) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक: अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ., दि.१७.०७.२०२५ मधील गट-ड संवर्गाकरीता असणाऱ्या अटी लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१५१७३२१०४५१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPALI UPENDRA JAPE

Digitally signed by DEEPALI UPENDRA JAPE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=735d6d81d9099a643dc5a1e7e261a6ea60ad4418817bd25d02db4654ea8c8e11,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F1EDA6DD54D9C1D002A33252AA96B6C559E22C914431F772457B39E98A5FCEAC, cn=DEEPALI UPENDRA JAPE
Date: 2025.09.16 11:32:16 +05'30'

**( दीपाली जपे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

२) मा. राज्यमंत्री (कामगार), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग,उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई

४) कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

५) अपर कामगार आयुक्त, नागपूर/पुणे विभाग

६) कामगार उप आयुक्त, नाशिक/अमरावती विभाग

७) कामगार उपआयुक्त (प्रशासन), कामगार भवन, ई-ब्लॉक, सी-२०, वांद्रे - कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.

८) महालेखापाल कार्यालय (ले. व अ.)/(ले.प.), मुंबई-४०० ०२०.

९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

१०) निवड नस्ती ( कामगार-८)

शासन निर्णय क्र. शासन आदेश क्र. अकंपा- ०९२५/प्र.क्र. २१७/काम-८, दि. १५ सप्टेंबर, २०२५ चे

विवरणपत्र- अ

| अनुकंपा नियुक्तीसाठी गट-ड च्या प्रतिक्षासुचीतून पुनर्जीवित करावयाची पदे | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कामगार आयुक्त कार्यालय मुंबई व त्यांचे अधिनस्त विभाग | | | | | |
| अ.क्र. | विभाग/ कार्यालय नाव | पदनाम | मंजूर पदे | नियुक्ती प्राधिकारी कार्यालयाच्या प्रतिक्षासूचीवर प्रलंबित उमेदवारांची संख्या | सा.प्र.वि. शासन निर्णय दि.१७ जुलै, २०२५ अन्वये गट-ड संवर्गातील पुनर्जीवित करावयाची पदे |
| **१** | | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | मुंबई (मुख्यालय) | शिपाई | २७ | ०१ | ०१ |
| २ | नाशिक | शिपाई | २४ | ०२ | ०२ |
| ३ | अमरावती | शिपाई | १५ | ०१ | ०१ |
| ४ | नागपूर | शिपाई | २६ | ०१ | ०१ |
| ५ | पुणे | शिपाई | ४० | ०७ | ०७ |
| **एकूण** | | | | | **१२** |